REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# अण्णाभाऊ साठेंच्या लोकनाटयातील वर्ग संघर्ष

प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.

**प्रस्तावना:-**

अण्णाभाऊंसाठेंनी त्या काळी प्रसिध्द असलेल्या 'तमाशा' या कला प्रकाराचे लोकनाटयात रुपांतर केले, गण-गौळणी पासून ते वगनाट्यपर्यत अमुलाग्रत बदललेले, लोकनाटय प्रथमच जनतेसमोर आले. महाराष्ट्र शासनाने लाल बावटा कला पथकावर बंदी घातल्यानंतर, अण्णाभाऊ साठेंच्या कलेला बंदिस्त केवळ बहिष्कृत केले नाही तर, एक प्रकारे बंदिस्त करुन टाकले. परंतु शांत राहण्याचा पिंड अण्णाभाऊ साठेंचा नव्हता, त्यांनी आपल्या प्रतिभेने तमाशाचे लोकनाटयामध्ये रुपांतर करुन ते राष्ट्रीय प्रवाहातील जनजागृतीचे एक मानद आणि प्रभावी साधन बनविले.

'लोकनाटय' हे अण्णाभाऊ साठेंनी केलेला विद्रोह आहे. लोकप्रिय लोककलेच्या माध्यमातून जनतेपर्यत पोहोचविण्यासाठी आणि तळागाळात जाऊन प्रबोधन करण्यासाठी अण्णाभाऊ साठेंनी निवडलेला मार्ग आहे. या विद्रोहाचे समर्पक वर्णन देतात डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात थिएटरात अडकुन पडलेला तमाशा लोकनाटय म्हणून मैदानात हजारो लाखे लोकांच्या समोर नव्या डौलाने अणला तो अण्णाभाऊ साठें यांनीच म्हणून या सर्व विद्रोहाचे पाणी पेटविणाऱ्या वीरांचा महाराष्ट्र शतशः ऋणी आहे अण्णाभाऊ साठे यांचे आभार व्यक्त करताना डॉ.गंगाधर पानतावने महाराष्ट्र त्यांच्या ऋणात असल्याचे प्रतिपादन करतात, कारण अण्णाभाऊ साठेंनी लोककलेच्या, लोकशिक्षणाचे साधन म्हणन वापर केला. यासंदर्थात विटेकर लिहीतात की, "अण्णाभाऊनी आपल्या नव्या तमाशाला लोकनाटय हे सयुक्तिक नाव दिले. हे लोकनाटय चांद्यापासून ते बांद्यापर्यंत हजारो लोकांसमोर रंगभूमीवर उभे राहिले, लाखो लोकांनी ते पाहिले सुशिक्षित, जमिनदार, मध्यमवर्गिय, आदिवासी, शेतकरी ,कातकरी, कामगार, तसेच वकील, डॉक्टर, प्रोफेसर, संत, पुढारीया सर्वानीच ते पाहिले त्यांना ते आवडले, म्हणजेच महाराष्ट्रातील समग्र वर्ग या लोकनाटयाचे ढवळून काढला, कारण अण्णाभाऊ साठेंच्या तमाशात महाराष्ट्रीय माणसाच्या हदयाला भिडणारे व त्यांनी मनाची पकड घेणारे असे गुण खात्रीने होते.[१] म्हणजेच अण्णाभाऊ साठे नावाच्या प्रबोधनकाराने आपल्या कलाकृतीने भुरळ घातली आणि अन्यायाविरुध्द बंड करण्यासाठी विद्रोह करण्यासाठी प्रेरित केलेले आहेत.

अण्णाभाऊ साठें या प्रयोगशील आणि प्रयत्नशील व्यक्तिमत्वाने सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये अमुल्य योगदान दिलेले आहे. कारण अण्णाभाऊ साठेंच्या लोकनाटयाचा उददेश समाजजागृती हाच असून मनोरंजन हा त्याचा व्दितीय उददेश आहे. एकाच वेळी मनोरंजन, प्रबोधन, व जागृती असा त्रिवेणी संगम उभा करणारे अण्णाभाऊ साठें हे महाराष्ट्रातील एकमेव शाहीर होय. एक अशिक्षित व्यक्ती, त्यातही मागास समाजात, बहिष्कृतता पिढयान पिडया सहन करीत अठराविश्व दारिद्रयाला सामोरे जात असताना, प्रतिभाशाली एवढा प्रगल्भ असू शकतो हा एक नैसर्गिक चमत्कारच आहे. ज्याने समाजप्रबोंधन व मनोरंजन हा त्याचा आत्मा अखेरपर्यत जिवंत स्वरुपात अमर ठेवलेले आहेत.

अण्णाभाऊ साठेंच्या लोकनाटयावर भाष्य कारताना विटेकर म्हणतात की, अण्णाभाऊंनी लोकनाटयात लोकशाही अंतरंग ओतले आणि स्वातंत्र्याच्या चळवळीशी त्यांचे नाते जोडले. अण्णाभऊंनी आपल्या प्रयोगशील प्रयत्नांनी पारंपारिक गण गौळणीची प्रथा माडीत काढून त्या जागी श्रमशक्तीची कास उभी केली. एकजूट, पराक्रम व ध्येयवाद या त्रीसूत्रीची लोकनाटयातून जोड घातली, या लोकनाटयांनी साक्षरतेची कास धरुन, शेतकरी कामगार आणि दिन दुबळयांचे प्रश्न हाती घेतले आहेत.

अण्णाभाऊ साठेंनी लोकनाटयाचा बदललेल्या परंपरेबददल सांगताना वि.कृ. जोशी लिहीतात की, "लोकनाटयाचा परंपरेत पहिलेच महत्वाचे वळन अण्णाभाऊंनी घेतले. आजपर्यत अश्लिल वाटणारा तमाशा त्यांनी लोकनाटय या नामाधानानेच सुजनरुपात उभा केला. याशिवाय तमाशाच्या अंगी असलेले करमणूकीचे अंग त्यांनी केवळ करमणूक प्रधान न ठेवता प्रबोधन, राष्ट्रीयता, जागृती आणि मनोरंजन अशा विविध आकारांत रुपातर करुन टाकले, ज्यामुळे अण्णाभाऊंचे लोकनाटय एक वेगळेच वळण पार करुन गेले.[२] यावरुन असे दिसून येते की, अनेक विचारवंत, संशोधक आणि अभ्यासक लेखक यांनी अणाभाऊ साठे यांच्या लोकनाटयांचा संशोधनपूर्ण शोध घेवून त्या लोकनाटयाला लोकशिक्षणाचे, राष्ट्रीय भावना वाढीस लावण्याचे प्रबोधनाचे महत्वाचे साधन म्हणून मान्य केलेले आहे. आणि महाराष्ट्राला ही अण्णाभाऊ साठेंची देणगी असल्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे पसंतही केलेले आहे, अण्णाभाऊ साठेंनी सामाजिक समस्या समाजासमोर मांडतांना, त्या समस्याची उकल करुन, त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रबोधन करण्यासाठी 'लोकनाटय' या कला प्रकाराचा अवलंब केला आणि त्यामध्ये ते यशस्वीही झाले आहेत. अण्णाभाऊ साठेंच्या कर्तृवाला तमाशा कलावंत म्हणून हिनावणाऱ्यांना ही जोरदार चपराक आहे.

म्हणून अण्णाभाऊ साठेंचे व्यक्तिमत्व आणि जन्मजात प्रतिभेच्या जोरावर त्यांनी निर्माण केलेल कर्तृत्व हे प्रत्येकाला मान्य करावे लागले. कारण लोकशिक्षण आणि लोकजागृतीसाठी चळवळ उभा करुन आपल्या कलाकृतीच्या माध्यमातुन ती यशस्वी करणारे हे पहिले आणि एकमेव शाहीर, लेखक आहेत म्हणूनच त्यांना लोकशाहीर म्हणून संबोधले जाते.

### अण्णाभाऊ साठेंची लोकनाटये

- अकलकली गोष्ट - १९४५
- खापऱ्या चोर - १९४६
- देशभक्त घोटाळे - १९४६
- निवडणूकीत घोटाळे - १९४६
- शेटजीच इलेक्शन - १९४६
- बेकायदेशीर - १९४७
- माझी मुंबई - १९४८
- मुक मिरवणूक - १९४९
- लोकमंत्र्याचा दौरा -१९५२
- पुढारी मिळाला - १९५२
- अकलेची गोष्ट :-

अण्णाभाऊ साठेंनी आपल्या पहिल्याच लोकनाटयामध्ये कार्ल मार्क्सच तत्वज्ञान आणि कार्ल मार्क्सची इतिहासाच्या विकासक्रमाची शास्त्रीय संकल्पना, अशिक्षित कष्टकरी, कामगारांना सहज, सुलभ सोप्या माध्यमातून समजावून देणे आणि समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील कष्टकऱ्यांचे महत्वाचे स्थान त्याच्या मनावर हा अकलेची गोष्ट या लोकनाटयाचा स्पष्ट केल्याचे दिसून येते.

कार्ल मार्क्सचे तत्वज्ञान हे सैध्दांतिक आणि तत्वज्ञानावर आधारित असल्यामुळे ते सहज लक्षात येणे शक्य नाही, कारण पारिभाषिक संकल्पनांनीयुक्त हे तत्वज्ञान बुध्दीच्या कसोटीवर घालण्याशिवाय उमगत नाही ते तत्वज्ञान अगदी सोप्या सहज आणि सुलभ भाषेमध्ये निरक्षर जनतेला समजावून सांगण्याचा प्रयत्न 'अकलेली गोष्ट' या लोकनाटयातून अण्णाभाऊ साठेंनी केलेला आहे. या करिता अण्णाभाऊंनी पराकोटीचे परिश्रम घेतलेले आहेत आणि आपण अव्वल दर्जाचे अभ्यासू कलावंत असल्याचे दाखवून दिलेले आहेत.

जगाला पेलुन धरलेला कष्टकरी कामगार हा जगातील सर्व संकल्पनांचा मुलधार आहे परंतु त्याला ही जाणीव नसल्यामुळे, तो असंघटीत आणि बेसावध असतो, भांडवलदार शोषक वर्ग हे जग आपण निर्माण केलेल असल्याचे भासवून कामगारांना गुलाम बनवून पाहतात अज्ञानी लोक यावर विश्वास ठेवून त्यांचे ऐकत जातात आणि यातूनच शोषणाची नांदी पडते, शोषणाची प्रक्रिया वाढत जाते, परंतु ज्ञानबा नावाचा कष्टकरी भाडवलदारांचे पितळ उघडे करुन, त्यांना कशा प्रकारे विरोध करतो याचे चित्रण अण्णाभाऊ साठेंनी या लोकनाटयामध्ये केलेले आहे. वर्गलढया भावनेतून लिहीलेले हे लोकनाटय सामान्य माणसाला मार्क्सवादी तत्वज्ञानाची ओळख करुन देणारे लोकनाटय आहे. भांडवलदार आणि श्रमिक यांच्यामध्ये लुट लुबाड करुन कशाप्रकारे शोषण केले जाते, हे या लोकनाटयामधून दाखवून लोकांना सावध करण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठेंनी या लोकनाटयाच्या माध्यामातून केलेला आहेत. या लोकनाटयाने भांडवलदार मालक वर्गाची झोप उडवली होती. या लोकनाटयाच्या नायकाच्या रुपात, प्रत्येक कामगार स्वत:ला पाहात होता, कारण आपली कुठे ना कुठे फसवणूक, पिळवणूक झालेली त्यांच्या दृष्टांतास पडत होती, कीसान गीताने या लोकनाटयाचा शेवट करुन, विजयाची आशा मुलभुत स्वप्न अण्णाभाऊ साठेंनी 'अकलेली गोष्ट' या लोकनाटयाच्या माध्यमातून जनमाणसात जागे केलेले आहेत.

### खापऱ्या चोर - १९४६

या लोक नाटयामध्ये अण्णाभाऊ साठेंनी जमीनदार सावकार आणि पारंपारिक व्यापारी या पिळवणूक करणाऱ्यांना, आपल्या टिकेचा आणि आपल्या थट्टेचा विषय बनवले आहे. वर्ग जाणीव झालेली कामगार अनेक युक्त्या लढवून या पिळवणुकदाराना शेतकऱ्यांच्या जमिनीवर हक्क सोडायला लावतात, याचे चित्रण 'खापऱ्या चोर' या लोकनाटयामध्ये व्यक्त केलेले आहेत.

कष्टकरी आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि सावकराच्या जुलमी बहुपाशात अडकलेल्या, आपल्या जमिनी कशा सोडवून घेतात, यांचे विनोदी आणि मार्मिक पध्दतीने चित्रण अण्णाभाऊ साठेंनी या लोकनाटयातून घडविलेले आहेत.

सनगरवाडीचा दाजीबाजी हा भोलाराम नावाच्या सावकाराने त्याची जमीन लुटल्यामुळे भुमिहीन होऊन, कामाच्या शोधात गावोगाव फिरत असतो या काळात चोऱ्या करुन जगण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय उरतनाही आणि तो चोर बनतो परंतु त्याला सराईत दरोडेखोर नव्हे तर खापऱ्या चोर म्हणून ओळखले जाते. एके दिवशी तो गावात येऊन, भोलारामच्याच घरी चोरी करतो आणि नाटयमय पध्दतीने गावच्या पाटलालाही त्या चोरी मध्ये अडकवतो. आणि भोलारामला त्याची आणि सितारी जमीन परत देण्यास भाग पाडतो असे, या लोकनाटयाचे

कथानक आहे. या लोकनाटयामध्ये खापऱ्या चोरीची भुमिका स्वतः अण्णाभाऊ साठेंनी केल्यामुळे, त्याची परिणामकारकता अधिकच वाढलेली होती, शेवटी भोलारामला सावकारकी सोडण्यासाठी हतबल केल्याचे या लोकनाटयामध्ये दाखविण्यात आलेले आहे.

**देशभक्त घोटाळे लोकनाटय - १९४६**

अण्णाभाऊ साठेंनी १९४६ मध्ये लिहीलेले हे लोकनाटय स्वातंत्र्य संग्रामाच्या पराकोटीचा संघर्ष दुसऱ्या जागतिक महायुध्दातील स्थित्यंतरे, देशातील गंभीर परिस्थिती इत्यादी सर्व धामधुमीमध्ये लिहलेले आहे, म्हणजेच एकीकडे आंतराष्ट्रीय पातळीवर पोवाडे लिहुन जगाची माहिती ठेवण्यासोबतच, देशांतर्गत भांडवलदार वर्गा सोबत संघर्ष करत, बंगालला मदत करण्यासाठी चालविलेल्या चळवळीमध्ये सक्रिय सहभाग देत, देशातील राजकारण, शासन व्यवस्था आणि राजकीय वर्गावर टीकास्त्र सोडण्यासाठी लिहीलेले लोकनाटय आहे, यावरुन असे दिसून येते की, अण्णाभाऊ साठे हे एकाच वेळी अनेक आघाडयांवर कार्यदक्षपणे लढा देण्याचे कार्य करत होते, एवढया आघाडयावर एकत्रितपणे योगदान देणे हे त्यांच्या असाधारणपणाची प्रचिती देते. एक असामान्य नेतृत्व असल्याचेही स्पष्ट होते.

अण्णाभाऊ साठेंनी या लोकनाटयामध्ये ढोंगी आणि स्वार्थी नेत्याचा बुरखा फाडण्याचे कार्य केलेले आहे. घोटाळे आडनावाच्या कॉग्रेस नेत्याची थट्टा या लोकनाटयात केलेली आहे. घोटाळे हे आपला जनसंपर्क वाढवण्यासाठी ग्रामीण भागात जातात, ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्नांची त्यांना कसलीच जाणीव नसते, कारण त्यांचे वागणे, बोलणे सर्व ढोंगी स्वरुपाचे असते, वर्ग संघर्ष आणि त्याची जाणीव असलेला 'पुतळा' नावाची स्त्री त्या घोटाळे नावाच्या नेत्याला अनेक प्रश्न विचारते, कोणताही अभ्यास आणि जाण नसलेल्या त्या नेत्यांची भांबेरी उडते, त्याच्या झालेल्या बेजारीचे चित्रण, अण्णाभाऊंनी या लोकनाटयाच्या माध्यमातून उभे केलेल आहे. या मधून अण्णाभाऊ साठे जनतेला अवाहन करतात की, तुम्हीही तुमच्या नेत्याला अशा प्रकारेचे प्रश्न विचारुन, त्याला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन द्या, जेणे करुन नेता जनतेमध्ये येताना तत्पर राहील. त्याचे ढोग, थोतांड उघडे पाडा जेणेकरुन, जनतेची फसवणूक करण्याचा त्याचा डाव फसला जाईल. यावरुन असे दिसून येते की, नेता कसा असावा ? त्याला आपल्या मतदार संघाबरोबरच सभेवालच्या परिस्थीतीचे ज्ञान आणि जान असावी. त्या परिस्थितीतील समस्या सोडवण्यासाठी तो कटिबध्द असावा नुसते शब्दातूनच नव्हे तर कृतीतून त्याने हे दाखवून द्यावे अशा अपेक्षा व्यक्त करुन त्याबददलची जाणीव जनतेला करुन देण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठेंनी केलेले आहेत असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**निवडणूकीत घोटाळे लोकनाटय - १९४६**

अण्णाभाऊंनी या लोकनाटयामध्ये देशभक्त घोटाळे निवडणूकीत उभे राहिल्यानंतर निवडणूकीच्या धामधुमीत कशाप्रकारे घोटाळे करतात. प्रभाव पाडण्याच्या भानगडीत अवघड शब्द वापरुन, हास्यास्पद भाषणे करुन, मतदारांना भूलवण्याचा प्रयत्न करतात, परंतु चतुर मतदार त्यांचा कावा ओळखून त्यांचा डाव हाणून पाडतात आणि त्यांना घेरतात, त्यांची चेष्टा करतात अशा प्रकारचे कथानक प्रस्तुत लोकनाटयात अण्णाभाऊ साठेंनी सादर केलेले आहेत.

कॉग्रेस पक्ष हा त्याकाळचा प्रमुख, एकमेव प्रबळ पक्ष होता त्यांच्या कार्यपध्दतीला धोरणाला आणि कार्यकत्यांना उघडे पाडणे, डावी जनवादी भूमिका घेवून कॉग्रेसच्या मध्यभागी समन्वयवादी धोरणांची आणि कार्यक्रमांची कठोर चिकित्सा करणे, हे या लोकनाटयामधील विचार सूत्र आहे, यावरुन अण्णाभाऊ साठे यांच्या राजकीय जाणीवा कीती प्रगल्भ होत्या हे दिसून येते. म्हणून अण्णाभाऊ साठे हे केवळ मराठी साहित्य विश्वाचे नव्हे तर आंतरविद्याशाखीय शोध घेण्यासारखे व्यक्तिमत्व आहे, आंतरविद्याशाखीय द्रष्टीकोनातून त्यांचे योगदान तपासने गरजेचे आहे. असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**शेटजीच इलेक्शन लोकनाटय - १९४६**

१९४६ साली देश स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असताना, देशामध्ये निवडणूका लागल्या. पहिलीच निवणूक असल्यामुळे, ती अतिशय महत्वाची अशी निवडणूक होती. कम्युनिस्ट पक्ष आणि त्यांचा जाहिरनामा हे सामान्य लोकांना अनुकुल आहेत, तर कॉग्रेस श्रीमंतांचा, भांडवलदारांचा आणि स्थितीप्रिय लोकांचा पक्ष आहे, म्हणून निवडनुकीत कॉग्रेसचा धुव्वा उडवा हे पटवून देण्यासाठी 'शेटजीच इलेक्शन' हे लोकनाटय अण्णाभाऊ साठेंनी लिहीलेले आहेत.

कॉग्रेस कमिटिने स्वातंत्र्य युध्दामध्ये ब्रिटिशाच्या बाजुने आसणाऱ्या, मगरचंद नावाच्या मारवाडयाला पार्टी फंडासाठी ५० हजार रुपयांच्या आशेने उमेदवारी देते, म्हणून पैशासाठी पोरखले कॉग्रेस पार्टी अशी उमेदवारी कशी काय देऊ शकते.

असा सवाल या लोकनाटयात केलेले आहेत. समकालीन समाजातील राजकिय वास्तव त्यातून स्पष्ट होते. प्रचारासाठी आलेल्या मगरचंदला धोंडीबा आणि तारा खणखणीत प्रश्न विचारतात, तुम्ही निवडुन आल्यानंतर काय करणार ? यावर तो रस्ते, नाल्या, पुल, मंदिर, इत्यादी बांधून शिक्षण देणारे असे उत्तर देतो परंतु त्यावर धोंडीबा आणि ताराचे समाधान होत नाही, ते त्याला प्रश्न विचारतात की सावकारकी आणि जमिनदारीच्या रोगाची वाट काय ? काळयाबाजारवाल्याच्या संपत्ती जप्त करणार का ? सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत रणांगणामध्ये उतरणार का ? शेतीचे फेरवाटप करणार का ? या प्रश्नाचे उत्तरे मगरचंदकडे नसतात आणि कॉग्रेसच्या जाहीरनाम्यामध्येही नसतात, म्हणून तो भाबावून जातो हे सर्व कम्युनिस्ट पक्षाच्या जाहिरनाम्यामध्ये असल्यामुळे, तोच गरीबांचा, कष्टकरी, श्रमिक, कामगारांचा पक्ष आहे म्हणून तोच पक्ष गरिबांना न्यायदेऊ शकतो. हे सामान्य जनतेच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठेंनी या

लोकनाटयामध्ये व्यक्त केलेला आहेत, म्हजेच अण्णाभाऊ साठे हे राजकीय प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन कशाप्रकारे कार्य करत होते हे या लोकनाटयाच्या माध्यमातून दिसून येते.

### बेकायदेशिर लोनाटय - १९४७

अण्णाभाऊ साठेंचे हे लोकनाटय म्हणजे राजकीय व्यवस्थेवर ओढलेला आसुड आहे. पैशाच्या जीवावर निवडुन आलेल्या मगरचंदवर कॉंग्रेसमध्ये मंत्रिपद मिळते आणि निवडुन आलेल्यावर तो भांडवलदार, मीलमालक यांचे हितसंबंध जोपासतो आणि गिरणी कांमगारांचा संप बेकादेशीर म्हणून घोषित करतो. परंतु कामगार आपला संप अधिकच तीव्र करतात आणि याला घाबरुन सर्व गिरणीमालक कामगांराना मागण्या मंजुर करतात, असे या लोकनाटयाचे कथानक आहे. कामगार वर्गाचा आपमान करणाऱ्या जुलमी राजसत्तेच्या बेगडी न्याय संकल्पनेवर ताशेरे ओढताना अण्णाभाऊ साठे लिहीतात की,

"जलवाद म्हणजे माणूस, परतजात निराळी असते त्याची |
मोठा पगार, मोठा दर्जा, मोठया इभ्रतीची |
आणुन नव्या पुराव्याला साथदेती धनिकाला |
लवाद म्हणजे उंच दिसाव्यास उंच ि दिसायचा |
वर्षाला एक - एक पाऊल या हिशोबाने चालायला |
तोलुन बोल मालकाच्या बाजुने बोलायचा |
हाकुन मालक नेईल तिकड जायचा |
न्याय म्हणजे ओठ त्याचा लोंबत न्हायचा |
त्यात पराजय हुकमी कामगार वर्गाचा |
हा न्याय नव्हे आपमान कामगार वर्गाचा |[३]

या ओळीतून वर्ग लढयाची अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यची धार दिसून येते अण्णाभाऊ साठेंनी हे केवळ लिहुन ठेवलेलं नाही तर ते प्रत्यक्ष जनमाणसांमध्ये जाऊन वारंवार सादर करुन, त्यांच्या मनावर बिंबविण्याचे कार्य केलेले आहे. म्हणून अण्णाभाऊ साठेंचे साहित्य हे जागातील इतर साहित्यापेक्षा वेगळे असून ते जीवन जगण्याच्या प्रत्यक्ष घडामोडीचे चित्रण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### माझी मुंबई लोकनाटय - १९४८

अण्णाभाऊ साठेंचे 'माझी मुंबई' हे लोकनाटय हे राजकीय लढयाचा एक भाग आहे. महाराष्ट्राच्या स्वाभिमानी इतिहासाचे सुवर्ण पान आहे, कारण या लोकनाटयास पोलिसांनी पारवानगी दिल्यानंतरही मोरारजी देसाई यांनी त्यास विरोधकरुन त्यावर बंदी आणली. हा बंदी हुकूम मोडून अण्णाभाऊ साठे आणि त्यांचे सहकारी बहाददर कलावंतानी कामगार मैदानावर लाखो कामगारांसमोर या लोकनाट्याचा प्रयोग सादर केला, पोलीसांनी त्यांना अटक करण्यासाठी आगेकूच केल्यानंतर, सर्व कलावंत भुमीगत झाले, परंतु या लोकनाटयाने कीती लोकांना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी पेटविले याची गणती करता येणार नाही.

भाषा वार प्रांत रचनेच्या वेळी मुंबई महाराष्ट्रात असावी, की गुजरातमध्ये हा वादाचा मुददा बनला होता. महाराष्ट्र व गुजरात ही दोन्ही राज्ये मुंबईवर आपला हक्क सांगत होती. मुंबई शहराला स्वतंत्र्य राज्याचा दर्जा होता आणि महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन्ही राज्ये त्यामध्ये सामाविष्ट होती. अण्णाभाऊ साठेंनी 'माझी मुंबई' या लोकनाटयातुन मुंबई ही मराठी माणसाची मराठी भाषिकांची असल्याने ती महाराष्ट्राचीच असल्याची ठाम भूमिका ठासून मांडली आणि या भुमिकेमुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या लोकनाटयाच्या माध्यमातुन अधिक तीव्रता मिळाली. डॉ. बाबुराव गुरव म्हणतात की, "अण्णाभाऊ साठेंनी आपला जिता जागता देह संयुक्त महाराष्ट्राच्या पेटलेल्या रणकुंडात उभा केला, तो कोणत्याही मोहाने नव्हे, किंवा प्रलोभनाने नव्हे तर त्यांच्या अंगामध्ये, रोमारोमामध्ये भिनलेल्या आणि मुरलेल्या मराठी अस्मितेच्या प्रभावाने होय. संघर्षाच्या दहाकतेने स्वतःला जाळुन घेण्याचे अण्णाभाऊना मनस्वी आकर्षण होते. या खेरीज शोषक आणि शोषित यांच्यामधील मुलभुत झगडाही अण्णाभाऊनी या लढयात दिसत होता. या लढयामध्ये अण्णाभाऊ साठे प्राणपणाने लढा देऊन, आपले योगदान देत होते. त्यांना कसल्याही फळाची अपेक्षा नव्हती. आपल्या आयुष्याची भवितव्याची भिती होती. आणि नाही परिवाराच्या अस्तित्व आणि भवितव्याची चिंता होती. अण्णाभाऊ साठेंचे संयुक्त महाराष्ट्र चळवळी मधील योगदान हे महाराष्ट्र निर्मितीसाठी अमुल्य असे आहे.

### मुक मिरवणूक लोकनाटय - १९४९

अण्णाभाऊ साठेंचे हे लोकनाटय म्हणजे, स्वग्रहातील समविचारी पक्षांमधील आपापसातील मतभेद मिटविण्यासाठी लिहीलेले लोकनाटय आहे. या लोकनाटयामध्ये समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्या कार्यपध्दतीतील फरक दर्शवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

भारतीय समाजवाद्यांची कार्यशैली मबाळ व त्यामुळे परिणाम न साधणारी तर साम्यवादी पक्षाची कार्यपध्दती जहाल आणि फलप्रद आहे असे दाखवण्यात आलेले आहे.

### लोकमंत्र्याचा दौरा लोकनाटय - १९४९

१९५२ कॉंग्रेसचे सरकार सत्तेवर आल्यानंतर, त्यांच्यामधील दोष दाखण्याचा प्रयत्न या लोकनाटयामध्ये करण्यात आलेला आहे. कार्यकत्यांशी जनमाणसांशी संपर्क नसल्याने, त्यांच्या समस्या माहित नसतानाही नेते, मंत्री कीती खोटारडेपणाचे बोलतात जनतेशी बेईमानीने वागतात, चाळ झोपडपटटीचे मुलभूत प्रश्न माहीत नसल्याने, त्यांच्या समोर उच्चभु वस्तीप्रमाणे उपदेश करतात झोपडपटटयातील बकाल जीवन जगणाऱ्यांशी कसल्याही प्रकारचे घेणे देणे नसणारे मंत्री दौऱ्यामध्ये मात्र कसे पोपटासारखे बोलतात, हे जनतेसमोर मोडण्याचा प्रयत्न या लोकनाटयामध्ये अण्णाभाऊ साठेंनी केलेला आहे. काळया बाजाराचा पोवाडा अण्णाभाऊ साठेंच्या नजरेला दिसणारी कमालीची विषमता, अराजकता, शासन प्रशासनाची अपयशाची शृंखला, अण्णाभाऊनी याच्या माध्यमातून मांडून जनतेचे प्रबोधन करण्यासाठी अविरत देह जिझवलेले आहेत.

### पुढारी मिळाला लोकनाटय - १९५२

अण्णाभाऊ साठे यांचे पुढारी मिळालाहे लोकनाटय पु.ल. देशपांडेच्या पुढारी पाहिजे या नाटकाला प्रत्युत्तर आहे वाघिरे गावातील गावकरी अनेक पुढाऱ्यांच्या सुळसुळाटाने बैचेन होतात. आणि कॉंग्रेसच्या डोईफोडे साहेब, समाजवादी पक्षाचे साथी पडवळ, शेतकरी नेता क्रांतीसिंह सत्तु यांच्यामधून गावच्या विकासासाठी नेमका कोण पुढारी म्हणून निवडावा यासाठी सर्व नेत्यांना एका स्टेजवर बोलवतात सर्व नेत्यांच्या वर्तन आणि व्यवहारावर असंतुष्ट होऊन गावकरी शेवटी क्रांतिसिंह सुत्तु याची पुढारी म्हणून निवड करतात. या लोकनाटयामध्ये अण्णाभाऊनी नेता निवडताना कोणत्या सावधानीपुर्वक कसे निर्णय घ्यावेत, आपल्या हिताचा विचार करणारा प्रभावी आणि प्रतिभासंपन्न नेता निवडण्यासाठी लोकांना मनोरंजनातून मार्गदर्शन करत त्यांचे प्रबोधन करतात. अण्णाभाऊ साठेंच्या सर्व समावेशक सामर्थ्याचे दर्शन यामधून होते.

### बिलंदर बुडवे लोकनाटय

हे लोकनाटय अण्णाभाऊंनी बुडवे आडनावाच्या एका बिलंदर माणसाच्या विलक्षण कार्यवाहीवर प्रकाश टाकण्यासाठी लिहीलेले आहे. विनोदी पध्दतीच्या सादरी करणामुळे ते कामगार जगतात अधिक लोकप्रिय ठरले. या लोकनाटयातून अण्णाभाऊ साठेंनी जनसामान्यांना काही संदेश दिलेले आहेत. त्यामध्ये माणसाने घेतलेली कर्ज बुडवु नये, जगामध्ये ठकास महाठक भेटतात. शेरास सव्वाशेर मिळाला की माणून योग्य मार्गावर येतो ही शिकवण बिलंदर बुडवे या लोकनाट्यातून अण्णाभाऊ साठेंनी दिलेली आहे. या संदेशामधून अण्णाभाऊ साठे नितीमत्ता स्वच्छ ठेवण्याचे शिकवतात.

### पेंग्याच लगीन लोकनाटय

हे लोकनाटय अण्णाभाऊ साठेंनी कोकणामध्ये काम करणाऱ्या तिल्लोरी समाजातील कोकणी कलांवंतासाठी कोकणी भाषेत लिहीलेले आहे. लग्न खर्चावर अनावश्यक केला जाणारा खर्च टाकून पैशाचा अपव्यय टाळावा. डॉ. माधव गादेकर यांनी अण्णाभाऊ साठे यांची साहित्य रचना समर्थ रामदास स्वामींच्या रचनेपेक्षा श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे. अण्णाभाऊ साठेंची प्रतिभा "समर्थ रामदास स्वामी एवढीच प्रखर व सर्व श्रुत आहे असे प्रतिपादन त्यांनी केलेल आहे. यास संदर्भ म्हणून तुलनात्मक दृष्टीने समर्थ आणि अण्णाभाऊ साठेंच्या स्वरुपात त्यांनी समोर ठेवलेल्या आहेत. आनंद भुवन मध्ये औरंगजेब बुडाल्याचे भिग उभे करताना समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

बुडाला औरंग्या पापी | म्लेंच्छक संहार जाहला
मोडली मांडणी क्षेत्रे | आनंद भुवनी |

याच विषयावर अण्णाभाऊसाठेंनी केलेले वर्णन पाहता अण्णाभाऊ साठेंनी रामदास स्वामी पेक्षा बरीच उंची गाठली होती, याचा प्रत्यय त्यांचा वर्णनातून येतो अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

भोगली सैन्य पेंढारे | देऊनि त्या मार |
केले बेजार |
औरंगजेब नमविला | दिल्ली खान दमविला |
शाहिस्ते खान शासिला | जी जी जी ..

अण्णाभाऊ साठेंनी औरंगजेब, शाहिस्ते खान आणि दिल्लीच्या तख्ताची फटालजीती चित्तवेधक स्वरुपामध्ये समर्थ रामदास स्वामी पेक्षाही सरस स्वरुपात लिहून आपली प्रतिभा सिध्द केलेली आहे. समर्थ रामदासा पेक्षा ही प्रखर, परखड आणि मार्मिक शब्दांमध्ये आणि संक्षिप्त स्वरुपामध्ये अण्णाभाऊ साठे आपला आशय आणि विषय मांडू शकत होते असे उपरोक्त स्वरुपातून दिसून येते परंतु तेजस्वी अण्णाभाऊ साठे नावाचा हा तेजस्वी तारा अपेक्षित आणि वंचितत शाहिला याची खंत आणि सल मनात डोकावने म्हणजेच अण्णाभाऊ साठेंच्या शब्दप्रपंच्याची ताकद आकण मौलिकता यावरुन दिसून येते. यासाठी हे लोकनाटय लिहीलेले आहे. पेंग्या नावाच्या एका सामान्य तरुणाचे लग्न हुंडा न घेता व आवश्यक खर्च न करता साध्या पध्दतीने साजरे होते असे या लोकनाटयाचे कथानक आहे म्हणजेच अण्णाभाऊ साठेंनी समाजाची अनिष्ठ रुढी, परंपरांवर आघात करुन, हुंडा पध्दती बंद करण्याचे अवाहन करख्द्ध, लग्नामध्ये केलेल्या जाणाऱ्या अनावश्यक खर्चालाही आळा घालण्याचा संदेश दिलेला आहे यावरुन असे दिसून येते की, अण्णाभाऊ साठे हे उघडया डोळयाने समाजाकडे पाहुन त्यांचे दैन्य, दास्य दारिद्रय निवारणासाठी समाजाचे ज्वंलत प्रश्न ऐरणीवर आणून ते संपुष्टात आणण्यासाठी आपल्या लोकप्रिय कलाकृती मधून समाजप्रबोधन करत होते.

## दुष्काळात तेरावा लोकनाटय

हे लोकनाटय अण्णाभाऊ साठेंनी दुष्काळाची दाहकता आणि गांभीर्य जनतेसमोर मांडण्यासाठी लिहीलेले असून यामध्ये दुष्काळाचे वर्णन केलेले आहे. त्यातही घरी येणाऱ्या पाहुण्यांची तारंबळ कशी उडते याचे विनोदी वर्णन या लोकनाटयात आहे. दुष्काळामध्ये अन्नासाठी दशा झालेला माणूस दुष्काळाच्या दाहकतेमध्ये होरपळत आसताना, पाहुणे घरी आल्यानंतर त्या पाहुण्यास तेराव म्हटलेले आहे म्हणून यास दुष्काळात तेरावा हे नाव हे अण्णाभाऊ साठेंनी दिले एकुण १२ महिने दुष्काळात अगोदर जड, असहय झालेले असतात आणि त्यात तेरावा महिना आला की माणसाची भंबेरी उडते आणि त्याच्या झळा किंवा परिणाम हे पाहुण्यांना सुध्दा सोसावे लागतात हे या लोकनाटयाच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठेंनी केलेला दिसून येतो.

## सारांश व निष्कर्ष :-

अण्णाभाऊ साठेंची शाहीरी ही केवळ काल्पनिक किंवा केवळ मनोरंजक नसून तो शोषितांच्या जीवन जगण्याचा लढा आहे. पेशवाईच्या काळात राजदरबारात लोळणारी शाहीरी अण्णाभाऊ साठेंनी दिन-दलितांच्या सेवेत उभी केली, सर्व वर्गाला वेड लावणारी आणि व्यापुन टाकणारी तसेच लढयासाठी प्रेरित करणारी त्याची शाहीरी होती म्हणून ती क्रांतीची भाषा बोलणारी शाहीरी होती. आणि या सर्व शाहिरी मधून अण्णाभाऊ साठेंनी आंबेडकरवाद आणि मार्क्सवादाचा सुवर्ण संगम साधत, जागतिक पातळीवरील प्रश्न आपल्या शाहीरी वाङ्मयातून हातळलेच परंतु इथल्या शोषितांचे दुःख वेदना हि व्यथाही तितक्याच आत्मियतेने त्यांनी मांडल्या आणि नवीन जीवनमूल्ये धारण करण्यासाठी प्रेरित आशावाद निर्माण केला. मालक, सावकार, जमीनदार, संरजमदार, भांडवलदार आणि राजकीय पुढारी यांचा नकली मुखवटा फाडून त्यांच्यावर प्रचंड प्रहार करण्याचे कार्य अण्णाभाऊ साठेंच्या शाहीरीने केलेले दिसून येते.

## संदर्भ सुची:-

१. डॉ. गादेकर माधव, पुवोक्त प्र.क्र. १३६
२. तत्रैव - प्र.क्र. १३८
३. तत्रैव - प्र.क्र. १५१